**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- २९/०७/२०१८

# मोटर सायकल चोरी करणारे आंतरजिल्हयातील गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात चोरीच्या ११ मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री संजय दराडे साो**, व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड साो** यांनी मोटर सायकल चोरीचे वाढते गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी मोटर सायकल चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दतीबाबत माहिती घेवुन वर्दळीचे ठिकाण, बाजारपेठ, बॅंक, हॉस्पिटल, लॉन्स व शहरातील मुख्य रस्त्यांवर पाळत ठेवुन मोटर सायकल चोरी केले जाते व सदर चोरीच्या मोटर सायकल हया कमी किंमतीत बनावट नंबर प्लेट तयार करून विक्री केल्या जातात बाबत गोपनीय रित्या सविस्तर माहिती घेतली व त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सतर्क पेट्रोलिंग करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक २८ जुलै २०१८ रोजी **स्थानिक गुन्हे शाखेचे** पथकातील अधिकारी व कर्मचारी मोटर सायकल चोरणारे गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी गस्त घालत असतांना **पोलीस निरीक्षक अशोक करपे** यांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे नाशिक जिल्हयाचे सिमावर्ती भागातील काही संशयीत इसम हे मोटर सायकलींची चोरी करून कमी किंमतीत अतिदुर्गम भागात विक्री करतात बाबत समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी कळवण तालुक्यातील नांदुरी परिसरात सापळा रचला, दरम्यान एका डिस्कव्हर मोटर सायकलवर दोन संशयीत इसम नांदुरी गडाचे दिशेने येतांना दिसले, त्यांना मोटर सायकल थांबविण्याचा इशारा केला असता त्यांनी मोटर सायकल भरधाव वेगाने चालवुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला, पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना पाठलाग करून शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसम नामे **१) सतिष पंढरीनाथ पिंपळे,** वय २०, रा. चंदनझिरा, हनुमान मंदिराचे पाठीमागे, **जालना, ता.जि.जालना, २) नितीन दत्ता कराडे,** वय ३०, रा. बजाज नगर, **वाळुंज एमआयडीसी, औरंगाबाद** यांना विश्वासात घेवुन सदर मोटर सायकलचे कागदपत्रांबाबत विचारपुस करता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने पोलीस खाक्या दाखविताच त्यांनी सदर मोटर सायकल सुमारे दोन महिन्यांपुर्वी मोहाडी शिवारातुन चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत **दिंडोरी पोलीस ठाणेस । गुन्हा रजि.नं. १४६/२०१८ भादवि कलम ३७९** प्रमाणे मोटर सायकल चोरीचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा उघडकीस आलेला आहे.

वरील दोन्ही आरोपीतांना अधिक विश्वासात घेवुन सखोल चौकशी केली असता त्यांनी त्यांचे साथीदार नामे ३) संतोष जाधव, रा. जालना, ४) वसंत चोथवे, रा. वणीगड, ता.कळवण यांचेसह नाशिक शहर व ग्रामीण भाग, तसेच औरंगाबाद, अहमदनगर, श्रीरामपुर परिसरातुन ब-याच मोटर सायकली चोरी केल्या असल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपी हे चोरी करून आणलेल्या मोटर सायकली त्यांचा वणीगड येथील साथीदार वसंत चोथवे यास विक्री करण्यासाठी देत असल्याचे निष्पन्न झाले आहे. वरील आरोपीपैकी ताब्यात घेतलेले आरोपी सतिष पिंपळे व दत्ता कराडे यांचे कब्जातुन वणीगड परिसरात विक्रीकरीता लपवुन ठेवलेल्या **०२ हिरो होण्डा स्प्लेंडर, ०१ बजाज डिस्कव्हर डीटीएसआय, ०१ यामाहा एफझी-१६, ०१ हिरो एच.एफ.डिलक्स, ०१ बजाज पल्सर २२०, ०१ हिरो होण्डा स्प्लेंडर प्लस, ०१ स्प्लेंडर प्रो, ०१ होण्डा स्टनर, ०१ हिरो सी.बी.झेड, ०१ हिरो पॅशन प्रो, अशा एकुण ११ महागडया मोटर सायकल किं.रु. २ लाख ९० हजार रुपये** किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मोटर सायकल व ताब्यात घेतलेले आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी दिंडोरी पोलीस ठाणेस हजर करण्यात आलेले आहे. ताब्यात घेतलेले वरील आरोपी व त्यांचे इतर साथीदार हे सराईत गुन्हेगार असुन आंतरजिल्हयातील मोटर सायकल चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

**नागरीकांना आवाहन :-**

जप्त करण्यात आलेल्या वरील **मोटर सायकलींचे** नंबर गुन्हेगारांनी बदलेले असुन ते बनावट आहे. ज्या नागरीकांच्या मोटर सायकल चोरीस गेल्या असेल त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा कार्यालय फोन नंबर ०२५३-२३०९७१०, तसेच **दिंडोरी पोलीस ठाणे दुरध्वनी क्र. ०२५५७-२२१०३३** या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयासह विविध भागातुन चोरीस गेलेल्या मोटर सायकल हया बनावट नंबर प्लेट बनवुन वापरल्या जातात, यासाठी ग्रामीण पोलीसांतर्फे नंबरप्लेट बनविणारे दुकानधारकांना आवाहन करण्यात येते की, दुचाकी अथवा चारचाकी वाहनांच्या नंबरप्लेट बनविण्याकरीता येणारे इसमांकडुन गाडयांचे आर.सी.बुक, लायसन्स परवाना, तसेच संबंधीत इसमाचे आधारकार्ड असे कागदपत्रांची पडताळणी करून त्याच्या छायांकित प्रति घ्याव्यात व त्याची स्वतंत्र रजिष्टरला नोंद घेवुनच नंबरप्लेट तयार करण्यात यावी. चोरीच्या वाहनांना बनावट नंबर प्लेट तयार करून देणारे इसमांचा पोलीस पथक शोध घेत असुन यापुढे त्यांचेवरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री.विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक **श्री. एम.एस.रणमाळे,** सपोउनि रामभाउ मुंढे, संजय पाटील, पोहवा हनुमंत महाले, तुपलोंढे, जे.के. सुर्यवंशी, दिपक आहिरे, पुंडलीक राउत, गणेश वराडे, दत्तात्रय साबळे, नामदेव खैरणार, अशोक जगताप, कैलास देशमुख, मुनिर सैय्यद, विष्णु जुंदरे, पोना वसंत खांडवी, अमोल घुगे, पोकॉ विश्वनाथ काकड, कपालेश्वर ढिकले, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, गणेश पवार, चालक गोकुळ सांगळे यांचे पथकाने वरील आरोपीतांना ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.